• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक २८१ • बुधवार,दि. १० जानेवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 281 • Wednesday 10 Janewari 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# बीड लोकसभेसाठी राष्ट्रवादी मैदानात



## लोकसभेचे माजी खा.जयसिंग गायकवाड उमेदवार?

## आ.संदीपभैय्यांची राहणार महत्त्वाची भुमिका

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शरद पवारांच्या राष्ट्रवादीने वेगवेगळ्या मतदारसंघात चाचपणीला सुरुवात केली आहे. इच्छुकांसोबत बोलत शरद पवारांची राष्ट्रवादी पुर्ण ताकतीने या निवडणुकीत उतरण्याचे मनसुबे आखत असून काल बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे पदाधिकारी आणि इच्छुकांसोबत शरद पवार, जयंत पाटील यांच्यासह अन्य नेत्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत इच्छुकांना काही प्रश्न विचारले गेले, तर इच्छुकांनी आपले म्हणणे मांडत लोकसभा लढवण्याची तयारी दर्शविली. काल राष्ट्रवादी काँग्रेसची महत्वपुर्ण बैठक झाली. या बैठकीला खा. श्रीनिवास पाटील, आ. एकनाथ खडसे, राजेश टोपे, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब पाटील, प्राजक्ता तनपुरे, शशिकांत शिंदे, आ.संदीप भैय्या क्षीरसागर, हेमंत टकले, पवार, शेख, रोहिणीताई खडसे, निरज महाकाळ यांच्यासह आदी मान्यवर या बैठकीला होते. या बैठकीमध्ये २०२४ लोकसभा निवडणुकीवर चर्चा झाली. त्यामध्ये खासकरून बीड लोकसभेसाठी एक महत्वपुर्ण बैठक झाली. या बैठकीत आ. संदीप क्षीरसागर यांच्यासह लोकसभा निवडणूक लढवू इच्छीणारे माजी खा. जयसिंगराव गायकवाड, , नरेंद्र काळे, देरेकर नाना हे उपस्थित होते. बीड लोकसभा मतदारसंघ गेल्या तीन टर्म मुंडेंकडे आहे. बीड जिल्हा हा शरद पवारांसाठी सकारात्मक जिल्हा मानला जातो. मात्र मध्यंतरी राष्ट्रवादीत उभी फूट पडली. त्यानंतर आगामी निवडणुकांमध्ये शरद पवारांची राष्ट्रवादी कशी असेल हे येणारा काळ सांगणार असला तरी राष्ट्रवादी काँग्रेसने बीड लोकसभा लढवण्यासाठी आतापासून तयारी सुरू ठेवली आहे.

# जेनेरिक औषधांची मागणी वाढली

**मुंबई । वृत्तसंस्था**

केंद्र सरकारच्या सातत्याच्या प्रयत्नांमुळे जेनेरिक औषधांच्या संदर्भात सर्वसामान्य नागरिकांची धारणा आता बदलू लागली आहे. सरकारकडून सुरू करण्यात आलेल्या जन औषधी केंद्रांच्या विक्रीत आता वाढ होते आहे. देशभरातील किमान ४० टक्के लोकांनी आता ब्रँडेड औषधांऐवजी जेनेरिक औषधांना प्राधान्य देण्यास सुरूवात केली असल्याचे एका अहवालाच्या आधारे पश्चिम बंगालमधील औषध वितरकांनी म्हटले आहे. सेंट्रम इन्स्टिटच्यूशनल रिसर्च या संस्थेचा हा अहवाल आहे. त्यानुसार आता जेनेरिक औषधांच्या बाबतीत लोकांचे विचार आता बदलू लागले आहेत. या औषधांच्या विक्रीत हळूहळू वाढ होते आहे. वाढती मागणी आणि जन औषधी केंद्रांच्या संख्येत झालेली वाढ पाहता ही औषधे आणखी स्वस्त होण्याची शक्यताही आता वर्तवली जाते आहे. आताच जेनेरिक औषधांच्या किमती ब्रँडेड औषधांच्या तुलनेत ५० ते ६० टक्के कमी आहेत. २०२६ या वर्षाच्या अखेरपर्यंत जन औषधी केंद्रांची संख्या वाढवून ती २५ हजार पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने ठेवले आहे. सध्या देशातील ७५३ जिल्ह्यांमध्ये १०,३७३ केंद्र आहेत. या केंद्रांवर रोज १० लाख लोक औषधे खरेदी करतात. २०२३ या वर्षात या केंद्रांमधून १२३६ कोटी रूपयांची औषध विक्री झाली आहे. ब्रँडेड औषधांऐवजी या औषधांना प्राधान्य देऊन नागरिकांनी स्वत:च्या ७४१६ कोटी रूपयांची बचत केली आहे. देशांतर्गत बाजारपेठेत आज जेनेरिक औषधांची भागिदारी ४ ते ४.५ टक्के आहे. उत्तर प्रदेशात देशातील सर्वाधिक १४८१ केंद्रे आहेत. जेनेरिक औषधांचा वाढता उपयोग हे सरकारचेही मोठे यश मानले जाते आहे. यामुळे औषधांच्या किमती कमी होतील आणि लोकांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध होतील असा विश्वास सरकारला वाटतो आहे. मूळ ब्रँडेड औषधांमध्ये जे घटक असतात त्याचसमान घटकांपासून जेनेरिक औषधे तयार केली जातात. मूळ ब्रँडेड औषधांप्रमाणेच या औषधांचाही प्रभाव असतो. मात्र त्यांचे मूल्य हे ब्रँडेडपेक्षा फार कमी असते.

जेनेरिक औषधांचे फायदे :- स्वस्तात उपलब्ध होतात, मूळ औषधांसारखीच प्रभावी असतात, जेनेरिक औषधे सहज उपलब्ध होतात. मात्र जेनेरिक औषधांचा वापर करण्यापूर्वी अगोदर डॉक्टरांशी चर्चा करणे गरजेचे असते. तसेच त्यांची एक्स्पायरी डेट तपासून घेणेही आवश्यक असते. या औषधांचा साठा करण्यासाठी योग्य तापमान आणि आर्द्रता ध्यानात घेणे आवश्यक आहे.


# फडणवीसांच्या संभाजीनगर दौऱ्याला मराठा समाजाचा विरोध

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ११ जानेवारीला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यात पाणीपुरवठा योजनेच्या उद्घाटनासाठी येत आहे. मात्र, त्याच्या याच दौऱ्याला आता सकल मराठा समाजाच्या वतीने विरोध होत असल्याचे पाहायला मिळत आहे. मराठा समाजाला सरसकट ओबीसीमधून आरक्षण देण्याचा निर्णय प्रलंबित असून, आरक्षणाचा निर्णय होईपर्यंत सरकारमधील कोणत्याही मंत्र्यांनी गंगापूर तालुक्यात येऊ नयेत अशी भूमिका मराठा समाजाच्या वतीने घेण्यात आली आहे. याबाबत गंगापूर तहसीलदार आणि पोलिसांना देखील निवेदन देण्यात आले आहे. मराठा आरक्षणाचा निर्णय होईपर्यंत राजकीय नेत्यांना अनेक ठिकाणी गावबंदी करण्यात आली आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री फडणवीस हे भाजप आमदार प्रशांत बंब यांच्या गंगापूर मतदारसंघात जलसिंचन पाणीपुरवठा योजनेच्या उद्घाटनासाठी ११ जानेवारीला येणार आहे. मात्र, त्यांच्या दौऱ्याला सकल मराठा समाजाने विरोध केला आहे. मराठा आरक्षणाचा विषय मार्गी लागत नाही तोपर्यंत सरकारमधील मंत्र्यांनी गंगापूर तालुक्यात येऊ नयेत असे मराठा समाजाच्या वतीने सांगण्यात आले आहे. सकल मराठा समाजाच्या वतीने पोलिसांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेतकऱ्यांना पाणी मिळावे म्हणून सुरु असलेल्या योजनेला आमचा विरोध नाही. योजनेसाठी पैसा जनतेचा आहे. ही योजना ज्या शेतकऱ्यांसाठी होत

▶▶ पान २ वर

# 'त्या' मराठा नेत्याला निवडणुकीत मराठेही हिसका दाखवणार -जरांगे पाटील



**बीड । प्रतिनिधी**

मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली आहे.आमरण उपोषण करायचं असेल तर त्यावर कारवाई होते का?, यापूर्वी देखील अजित पवारांवर मी बोललो आहे. यापुढे पुन्हा अजित पवार बोलले, तर त्यांना पुन्हा बघतो. मराठा समाजाशी मी प्रामाणिक आहे. मराठा समाजातील पोरांचं नुकसान होऊ नयेत असे मला वाटतं. त्यामुळे असे बोलून पुन्हा एकदा मराठ्यांच्या मुलांचं नुकसान करायची अजित पवारांची इच्छा आहे का?, यापूर्वी एकदा असेच बोलून त्यांनी नुकसान केलं आहे. त्यामुळे आम्हाला देखील नाइलाजाने पाऊलं उचलावी लागेल. अजित पवारांच्या हातानेच पुन्हा एकदा मराठ्यांच्या पोरांचं नुकसान होत असल्याचं समाजाच्या लक्षात आल्यावर मराठे बरच काम हातात घेतील आणि मी ते वेळेवर सांगेल, असे मनोज जरांगे म्हणाले आहेत. अजित पवारांच्या वक्तव्यानंतर आम्हाला सगळं काही समजलं आहे. मलाच काय तर सर्व समाजाला देखील कळलं आहे. पुन्हा एकदा मराठ्यांच्या मुलांचे हाल करायचे. पुन्हा एकदा मराठा समाजाच्या मुलांचं नुकसान करायचं. यापूर्वी एकदा मराठा समाजाच्या मुलांचे नुकसान केलं आता पुन्हा करायचं असा याचा अर्थ दिसत आहे. अजित पवारांबद्दल सध्या मी जास्त बोलत नाही. मात्र, आता पुन्हा एकदा जर कारवाई झाली, तर ती कारवाई अजित पवारांनीच करायला लावली असा त्याचा अर्थ होईल. कुणाच्या ट्रॅक्टरवर कारवाई झाली, कुठे लोकांना अडवलं तर ती कारवाई अजित पवारांनीच करायला लावली असे मराठे ग्राह्य धरतील, असे जरांगे म्हणाले. राज्यातील राजकीय परिस्थिती बदलली तरीही आम्ही मुंबईवर जाण्यावर ठाम आहोत. आमचं दुसरं कोणतंही नियोजन नाही, आमचं एकच नियोजन आहे. सरकार कुणाचंही असो आम्हाला त्याबद्दल फरक पडत नाही. आमच्यासाठी आमची मागणी महत्त्वाची असून, ती आम्ही लावून धरली आहे. आम्हाला सत्तेत कोण बसलय यापेक्षा आमच्या मुलांना न्याय हवंय हे महत्त्वाचं असल्याचं जरांगे म्हणाले. यापूर्वी जे काही कार्यक्रम झाले आहेत, ते सर्व लोकवर्गणीतून करण्यात आले. आम्ही कुणाकडूनही पैसे घेतलेले नाही. त्यामुळे मुंबईच्या आंदोलनाला जाण्यासाठी कोणी पैशांची मागणी करत असेल,

▶▶ पान २ वर

# भाजपने देश,लोकशाही आणि संविधान बाजूला ठेवले ;ठाकरे गटाच्या खा.प्रियंका चतुर्वेदी यांची टिका

**नागपूर । वृत्तसंस्था**

इंडिया आघाडीच्या तुलनेत भाजपची युती ही शरणागत पक्षांची युती असल्याची टीका ठाकरे गटाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी केली आहे. भाजप प्रणीत एनडीए ही मजबुरीतून झालेली युती आहे, त्यामानाने इंडिया आघाडीची २६ पक्षांची आघाडी ही खरी लोकशाही आघाडी आहे असेही त्यांनी म्हटले आहे. चतुर्वेदी यांनी दावा केला की इतर पक्षांना त्यांचे मत व्यक्त करण्यात किंवा पंतप्रधान यांच्या उपस्थितीत निर्णय घेण्यास प्रतिबंधित वाटते, त्यामुळे त्यांची ही भाजप प्रणित विविध पक्षांची युती म्हणजे केवळ शरणागत युती आहे. कारण प्रत्येकाला माहित आहे की त्यांनी जुलूमशाहीला पाठिंबा दिला तरच ते जिंकू शकतात. भाजपने देश, लोकशाही आणि संविधान बाजूला ठेवले आहे. आणि त्यांच्या युतीतील सर्व पक्षांनाही ते मान्य आहे. म्हणून त्यांनी शरणागती पत्करली आहे. ही शरणागती युती आहे,असे



प्रियंका चतुर्वेदी यांनी एका वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले. याउलट, चतुर्वेदी यांनी इंडिया आघाडी या २६ पक्षांच्या आघाडीच्या लोकशाही स्वरूपाची प्रशंसा केली. इंडिया आघाडीत मतभेद असू शकतात, पण ते लोकशाहीचे सौंदर्य आहे. हा चर्चेचा विषय आहे. मला आशा आहे की जागा वाटपाबाबत लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल आणि आम्ही देशाच्या संविधानासाठी आणि देशातील जनतेसाठी सर्वजण ही लढाई जोरदारपणे लढू आणि त्यात विजयी होऊ. २०२४ च्या लोकसभा निवडणुका जवळ येत असताना भारताच्या राजकीय परिदृश्यात महत्त्वपूर्ण संक्रमण होत आहे. विरोधकांची इंडिया आघाडी प्रस्थापित राष्ट्रीय लोकशाही आघाडीला आव्हान देण्यासाठी सज्ज आहे. जागा वाटपाच्या व्यवस्थेला अंतिम रूप देणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पंतप्रधान चेहरा ठरवणे यासह महत्त्वाच्या आव्हानांचे निराकरण करण्यासाठी हा गट सध्या प्रयत्नशील आहे.

पान १ वरून....

## फडणवीसांच्या

आहे, त्याच शेतकऱ्यांच्या हस्ते भूमिपूजन करावे. तसेच मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित असतांना, सरकारमधील कुठल्याही मंत्र्याने येऊन विकास कामाच्या उद्घाटनाच्या नावाखाली आमच्या तालुक्यातील सामाजिक वातावरण खराब करु नये. ११ जानेवारीला आरापूर शिवारात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे येत आहे. या अगोदर अनेक वेळा प्रसार माध्यमे, सभा यामधून मराठा समाजाच्या बाबतीत बेताल वक्तव्य करून समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहे. गंगापूर तालुका शांत असून, तेथे येऊन भावना भडकवू नये. यासाठी आम्ही लोकशाही मार्गाने सकल मराठा समाजाच्या माध्यमातून विनंती करत आहोत. उपमुख्यमंत्री व सरकारमधील कुठल्याही मंत्र्याने आमच्या तालुक्यातील येऊ नये. नसता होणाऱ्या परीणामास आयोजक, प्रशासन, महाराष्ट्र सरकार जवाबदार असेल याची गांभीर्याने नोंद घ्यावी, असे निवेदनात म्हटले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गंगापूर तालुक्याच्या दौऱ्यावर येत असून, आरापूर येथे त्यांची सभा देखील होणार आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांकडून सभास्थळाची पाहणी करण्यात आली. अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार यांनी सभास्थळी भेट देऊन पाहणी केली. सोबतच शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोरखनाथ शेळके इतर कर्मचारी देखील हजर होते.

## 'त्या' मराठा नेत्याला

कुणीही पैसे देऊ नयेत. तसेच कोणी पैसे दिले असेल तर ते परत घ्यावे. नंतर मला सांगू नका आम्ही पैसे दिले होते. त्यामुळे सर्वांना विनंती आहे की, कोणीही आंदोलनाच्या नावावर पैसे जमा करू नका. मुंबईला जाणे येण्याचा खर्च गाव पातळीवर मराठा समाज करणार आहे. त्यामुळे विनाकारण कोणीही आंदोलनाच्या नावावर पैसे गोळा करू नयेत असा थेट इशारा जरांगे यांनी दिला आहे.

पान ४ वरून...

## तर रोजगार हमीवरील

नसेल तर मजूर कामावर कसे येतील, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

१ जानेवारी रोजीचा एबीपीएस अहवाल
तालुका-मजूर संख्या-एबीपीएससाठी पात्र मजूर
अंबाजोगाई-२२,५४४-१०,७२१
आष्टी-५५,११०-३४,८९०
बीड-४२,५६३-२२,२२९
धारूर-१४,९४८-८,४१०
गेवराई-८२,३०६-३८,३१५
केज-२७,४५२-१७,८९८
माजलगाव-११,८८३-८,४६६
परळी-३०,३४२-१३,६१८
पाटोदा-१६,७९४-१०,६६७
शिरूर-३१,१३४-२०,२४९
वडवणी-१०,८५८-५,८९२
एकूण-३,४५,९३४-१,९१,३५५.

## विद्यार्थ्यांना सखोल

विश्वातील आभासी दुनिया , तारांगण प्रक्षेपण हे विद्यार्थ्यांना खगोलशास्त्राची आवड तसेच रात्रीच्या निरीक्षणातुन खगोलीय दृष्टीच्या जाणिव विकसित करण्याच्या अनुषंगाने अत्यंत उपयुक्त ठरले.विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेत ज्ञान संपादन केले. यावेळी विद्यार्थ्यांना आकाशगंगेतील हालचाली तसेच धूमकेतू सर्व ग्रह हे एकाच परीवारातील असुन सुर्याच्या जास्त जवळचा ग्रह बुध असुन त्याचा व्यास ३०२३ असा आहे.८८ दिवसात सुर्याची परीक्रमा तो पुर्ण करतो आदि माहिती देण्यात आली.या कार्यक्रमास महादेव ढास, भालचंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक अंगद हावळे, सचिन वाणी तसेच सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे , ग्रामीण युवा पत्रकार संघ युवा आघाडी बीड जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांच्यासह शिक्षक, पदाधिकारी, विद्यार्थी, कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. पुणे मुंबई सारख्या शहरांमध्ये करण्यात येणारे कार्यक्रम ज्यासाठी भरमसाठ फीस आकारण्यात येते . परंतु ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना याविषयी ज्ञान मिळावे या सदहेतुने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विनामूल्य ज्ञानार्जन करणारे पोलाद समुहाचे दिपक सामोसे यांचे आभार मानले पाहिजेत.

## विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व

केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.बी.आर. बोडके यांनी केले तर आभार प्रा.डॉ. गणेश मोकासरे यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी,विद्यार्थिनी प्राध्यापक यांची उपस्थिती होती.

## दिनदर्शिका माहिती

हिंदू धर्माची, सर्व पीठाबद्दलची माहिती ४ धाम, शक्ती पीठे यांचीही माहिती द्यावी जेणे करुन दिपावली अंक आणखी दर्जेदार बनेल असे सांगितले. सामाजिक कार्यकर्ते भास्करमामा चाटे यांनी देखील दिपावली अंक व विरशैव दिनदर्शिकेला शुभेच्छा दिल्या व पंचक्रोशीतील आणखी देव-देवतांना मुख्यपृष्ठावर स्थान द्यावे, त्यामुळे आणखी वाचकापर्यंत हा परळी समाचार अंक व दिनदर्शिका घराघरात व मना-मनापर्यंत पोहंचेल असे त्यांनी सांगितले. तसेच याप्रसंगी सुरेशभाऊ टाक, डॉ.विवेकजी दंडे यांनीही शुभेच्छा व्यक्त केल्या.

## श्री सिद्धेश्वर शैक्षणिक

अध्यक्षस्थानी माजलगाव शहरचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ होते व प्रमुख अतिथी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारीणी सदस्य अमरनाथ खुर्पे व बाजार समितीचे मा. उपसभापती अच्युत लाटे, ह.भ.प.शिवाजी गडदे महाराज हे होते.प्रास्ताविक रविंद्र कानडे तर या कार्यक्रमात चे सुत्रसंचालन अशोक वाडेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन विवेक बजाज यांनी केले.

## कागदपत्रे हरवले आहे

चंद्रकांत मुक्तीराम मेसे, रा. गंगनाथवाडी, ता.जि.बीड या नावाचे १२ वीचा मार्कमेमो, १२ वी सनद, १२ वी दाखला, १० वी मार्कमेमो, १० वी सनद ही महत्त्वाची ओरिजनल कागदपत्रे बीड ते नाथापूर प्रवास करताना दिनांक २९ डिसेंबर २०२३ रोजी हरवले आहेत. सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क :मो. ९१४६९०२१५५

# भाजप पुरस्कृत गद्दार सरकारमुळे राज्यातील अनेक प्रकल्प रखडली -आदित्य ठाकरे

**मुंबई । वृत्तसंस्था**

युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी पुणे शहरातील रखडलेल्या कामांवरून राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. पुणे- मुंबईसाठी राज्य सरकारच्या मनात एवढा तिरस्कार हा आहे असे म्हणत त्यांनी रखडलेल्या प्रकल्पांची यादीच दिली आहे. आदित्य ठाकरे यांनी ट्विटरवर पोस्ट करत याबाबत राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. आदित्य ठाकरे म्हणाले, गेल्या वर्षभरापासून पुण्याला लोकसभेत प्रतिनिधित्व नाही... फक्त महाराष्ट्रातील बेकायदेशीर राजवटीला ही जागा गमावण्याची भीती आहे. पण, भाजप पुरस्कृत खोके सरकार सार्वजनिक कामांची आणि नागरिकांच्या सुविधांची तमा देखील बाळगताना दिसत नाही! असे आदित्य ठाकरे म्हणाले. तसेच पुण्याचे नवीन विमानतळ टर्मिनल ४ महिन्यांहून अधिक काळ तयार असून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहे. या प्रमाणेच ३ महिन्यांपासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत असलेले एमटीएचएल, ८ महिन्यांपासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत असलेले दिघा रेल्वे स्थानक, उद्घाटनासाठी प्रलंबित असलेली उरण लाईन, खोके सरकारच्या व्हीआयपींच्या तारखा न मिळाल्याने पुणे नवीन विमानतळ टर्मिनलपासून वंचित राहिले आहे'', अशी यादीच आदित्य ठाकरे यांनी पुणे- मुंबईतील रखडलेल्या प्रकल्पांची मांडली आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडून महाराष्ट्रावर इतका अन्याय का होतो? एमव्हीए सरकार बदलल्यानंतर पुण्यातील प्रस्तावित नवीन विमानतळ रखडला आहे. खोके सरकारने पुणे जिल्ह्यातील वेदांत फॉक्सकॉन (चत- ने प्रस्तावित केलेला) प्रकल्प अचानक गुजरातला पाठवला. आणि आता विमानतळाच्या टर्मिनलच्या उद्घाटनाला ४ महिन्यांपासून उद्घाटनाच्या तारखांची प्रतीक्षा आहे. पुणे-मुंबईसारख्या शहरांचा केंद्रातील मंत्री आणि राज्य सरकार एवढा तिरस्कार करत असेल तर महाराष्ट्र न्यायाची अपेक्षा कशी करू शकतो? त्यांच्याकडे महाराष्ट्रात उद्घाटनासाठीही वेळ नाही का? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. पुण्यातील वार्षिक आंतरराष्ट्रीय संमेलन म्हणून एमव्हीएने सुरू केलेले पुणे अल्टरनेट फ्युएल कॉन्क्लेव्ह (पीएएफसी) देखील खोके सरकार यांनी बंद केले आहे. महाराष्ट्राच्या पर्यायी इंधन क्षेत्राला आणि पुण्यातील मोठ्या प्रमाणात विकसीत असलेला वाहन उद्योग क्षेत्राला चालना देण्याचा उद्देश होता. महाराष्ट्राची आर्थिक घुसमट करून भाजप पुरस्कृत खोके सरकार काय साध्य करत आहे? असाही प्रश्न करत आदित्य ठाकरेंनी सरकारवर हल्लाबोल केला आहे.

## मुंबईत धडकणारच, सकल मराठा समाज आक्रमक





**सांगली । वृत्तसंस्था**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठा समाजाला मुंबईत आल्यास गय केली जाणार नसल्याची धमकी दिली आहे. यावरून अजित पवार मराठाव्देषी असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांना मराठा समाज मागासच रहावा, त्यांच्या घरात कामाला जावा, असे वाटत आहे. मात्र आम्ही त्यांच्या धमकीला भीक घालणार नाही. २० जानेवारीला मुंबईला धडक देवून ओबीसीतूनच आरक्षण घेणार आहे, अशी माहिती सकल मराठा समाजाचे वसंतराव मुळीक आणि अॅड. बाबा इंदूलकर यांनी मंगळवारी दिली. पवार यांच्या मराठा विरोधी वक्तव्याचा त्यांनी निषेध नोंदवला. ते म्हणाले, मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळणार नाही, असे अजित पवार सांगत आहेत. याचा अर्थ त्यांना कायद्याचे शून्य ज्ञान आहे. मराठा समाजाला ओबीसीतूनच आरक्षण मिळते. इतर प्रवर्गातून दिले तर ते कोर्टात टिकत नाही. त्यांना ओबीसीतून आरक्षण द्यायचे नाही, म्हणजे न टिकणारे आरक्षण द्यायचे आहे का ? अजित पवार हे गुन्हेगारी वृत्तीचे आहेत. त्यांच्यावर ईडीने गुन्हा दाखल केले आहेत. जेलमध्ये जायला नको म्हणून ते भाजपच्या वळचणीला गेले आहेत. कोणत्याही दबावाला, धमकीला न घाबरता मोठ्या संख्येने मराठा समाज मुंबईला जाणार आहेत. आरक्षण मिळेपर्यंत मुंबई सोडणार नाहीत. समाजाला कोणी उचकटण्याचा प्रयत्न केला तर काहीही फरक पडणार नाही. छगन भुजबळ, प्रकाश शेंडगे यांच्या सारखे काही ओबीसी समाजाचे नेते समाजा समाजात भांडणे लावण्यासाठी २० जानेवारीलाच मुंबईत ओबीसी समाजही जाईल, असे म्हणत आहेत. मात्र त्यांना ओबीसी समाज साथ देणार नाही.

## मंत्री संदिपान भुमरेंची आमदारकी जाणार की वाचणार?

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिंदे गटाचे १६ आममदारांबाबत अपात्र की पात्र याबाबतचा निकाल १० जानेवारीला येणार आहे. विशेष म्हणजे याच १६ आमदारांमध्ये मुख्यमंत्री शिंदे याच्या जवळचे मंत्री समजल्या जाणाऱ्या संदिपान भुमरे यांचा देखील समावेश आहे. त्यामुळे मंत्री संदिपान भुमरेंचं काय होणार, त्यांची आमदारकी जाणार की वाचणार याकडे भुमरे समर्थकांचे लक्ष लागले आहेत. तर, कोण आहेत संदिपान भुमरे आणि त्यांचा राजकीय प्रवास कसा आहे त्याबद्दल जाणून घेऊ यात... संदिपान भुमरे छत्रपती संभाजीनगर



जिल्ह्यातील पैठण विधानसभा मतदारसंघाचं नेतृत्व करतात. याच मतदारसंघातून २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ते पाचव्यांदा आमदार म्हणून निवडून आले. १९९५ मध्ये त्यांनी पहिल्यांदा विधानसभा निवडणूक लढवली आणि त्यांचा विजय झाला. तेव्हापासून २००९ मधील विधानसभा निवडणूक सोडता आतापर्यंत सलग त्यांनी पैठणमधून विजयाची मालिका कायम ठेवली आहे. २०१९ मध्ये त्यांनी राष्ट्रवादीचे उमेदवार दत्ता गोर्डे यांचा १४ हजार १३९ मतांनी पराभव केला होता. विशेष म्हणजे महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये ते कॅबिनेट मंत्री होते आणि आता महायुतीच्या सरकारमध्ये देखील कॅबिनेट मंत्री आहे. मुख्यमंत्री शिंदे यांच्या जवळ असलेल्या नेत्यांच्या यादीत भुमरे महत्वाच्या स्थानी आहेत.

## मुख्यमंत्र्यांची शेतकरी आत्महत्या मुक्तीची घोषणा ठरली फोल

### ३६५ दिवसांत तब्बल ११४० शेतकऱ्यांच्या आत्महत्या



**मुंबई । वृत्तसंस्था**

महाराष्ट्र शेतकरी आत्महत्यामुक्त करू, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी सत्ता स्थापनेच्या पहिल्याच दिवशी केली होती. मात्र, शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबलेले नाही. पश्चिम विदर्भात २०२३ मध्ये म्हणजेच ३६५ दिवसांत तब्बल ११४० शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले आहे. राज्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या पश्चिम विदर्भात झाल्या आहेत. हे सर्व शेतकरी अस्मानी अन् सुलतानी संकटाचे बळी ठरले आहेत.

पश्चिम विदर्भात दर दिवशी तीन म्हणजेच दर आठ तासांत एक शेतकरी मृत्यूचा घोट घेत असल्याचे विदारक चित्र आहे. याची कारणे शोधण्यासाठी तत्कालीन कृषिमंत्री मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार एक दिवस अमरावती जिल्ह्यात मेळघाटातील आदिवासीबहुल शेतकऱ्याच्या घरी एक दिवस मुक्कामी राहिलेत. त्यानंतर त्यांनी शेतकरी आत्महत्याप्रवण १४ जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी व अन्य अधिकाऱ्यांना 'एक दिवस बळीराजासाठी' हा कार्यक्रम दिला व शेतकरी आत्महत्या होण्यामागची कारणे व अहवाल मागितला. शासनाचा उद्देश चांगला असला तरी अभियान मात्र फोटोसेशनपुरते मर्यादित राहिले.

पश्चिम विदर्भात गेल्या वर्षभरात ११४० शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत. यामध्ये शासन मदतीसाठी ५१७ प्रकरणे पात्र ठरली. याशिवाय ३१७ प्रकरणे शासन मदतीसाठी अपात्र ठरविण्यात आलेली आहेत, तर ११ महिन्यांपासून तब्बल २३५ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असल्याने शासन-प्रशासन याविषयी गंभीर नसल्याचा आरोप होत आहे.

सन २००१ पासूनची स्थिती

आतापर्यंत शेतकरी आत्महत्या : २०,००६

शासन मदतीसाठी पात्र प्रकरणे : ९,३७३

आतापर्यंत अपात्र प्रकरणे : १०,३९८

चौकशीसाठी अद्याप प्रलंबित : २३५

शेतकरी आत्महत्यांची प्रथमदर्शनी कारणे

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या माहितीनुसार पश्चिम विदर्भात जानेवारी महिन्यात १०३, फेब्रुवारी ७३, मार्च १०३, एप्रिल ८६, मे १०६, जून ९६, जुलै ८६, ऑगस्ट १०१, सप्टेंबर १०७, ऑक्टोबर १०४, नोव्हेंबर ८७, डिसेंबरमध्ये ८८, शेतकरी आत्महत्या होण्यामागे नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, नापिकी, बँकांचे व खासगी सावकारांचे कर्ज, कर्ज वसुलीसाठी तगादा, मुलीचे लग्न, आजारपण व यासह इतर बाबींमुळे येणारा मानसिक तणाव कारणीभूत आहे.

## महाराष्ट्राच्या अनेक भागात पाऊस

**पुणे । वृत्तसंस्था**

पुणे परिसरातील अनेक भागांत पावसाची रिमझिम सुरू झाली आहे. राज्यातील विविध ठिकाणी सध्या पावसाची रिमझिम सुरू झाली असून काही भागांत ढगाळ वातावरण आहे. आज दुपारपासून पुणे, अहमदनगर, सोलापूर या भागांत पावसाची रिमझिम सुरू झाली होती. तर कोल्हापूर परिसरात ढग दाटून आले आहेत. तर या पावसाचा काही पिकांवर वाईट परिणाम होणार असून काही पिकांसाठी हा पाऊस पोषक ठरणार आहे. दरम्यान, काही ठिकाणी रिपरिप तर काही ठिकाणी जोराचा पाऊस पडत आहे. अहमदनगर शहरातही पाऊस सुरू असून मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर शहरात काल (ता. ८) सायंकाळी पावसाची रिमझिम सुरू होती. तर मराठवाड्यातील धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना जिल्ह्यात पाऊस सुरू आहे. हा पाऊस केवळ दोन दिवस असेल आणि आज पावसाची तीव्रता जास्त राहील. उद्या केवळ ढगाळ वातावरण आणि काही भागात तुरळक पावसाची शक्यता आहे. परवा कोरडे वातावरण असेल. पण यानंतर पुढचे काही दिवस धुके दाटून येऊ शकते असा अंदाज जेष्ठ हवामानशास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी व्यक्त केला आहे. आज मराठवाड्यातील परभणी, धाराशिव, जालना, हिंगोली परिसरात हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# राष्ट्रीयकृत बँकांचे काम परभणीत असमाधानकारक -नरेंद्र पाटील

**परभणी । वृत्तसंस्था**

राज्य शासनाच्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या वतीने जिल्ह्यात आतापर्यंत १ हजार १११ युवकांचे कर्ज प्रकरणे बँकांनी मंजूर केले आहेत. त्यांना ७१ कोटी ८७ लाख रुपयांची रक्कम अदा करण्यात आली. त्यामुळे या १ हजार जणांना महामंडळाच्या माध्यमातून आपला नवीन व्यवसाय उभारण्यास मदत मिळाली असली तरी परभणी जिल्ह्यात राष्ट्रीयकृत बँकांचे काम महामंडळाच्या बाबतीत असमाधान कारक आहे. हे काम सुधारण्यासाठी आगामी काळात प्रयत्न केल्या जातील, अशी माहिती अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालय आयोजित पत्रकार परिषदेत दिली. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी राज्य शासनाने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना केली. या महामंडळाच्या माध्यमातून मराठा समाजातील युवकांना नवीन उद्योग उभारण्यासाठी कर्ज पुरवठा करण्यात येतो. या महामंडळाची स्थापना झाल्यापासून आतापर्यंत ३ हजार ५१६ लाभार्थ्यांनी नवीन उद्योगासाठी कर्ज पुरवठा मिळावा, या उद्देशाने या विकास महामंडळाकडे प्रस्ताव दाखल केले. या महामंडळाने प्राप्त प्रस्ताव संबंधित बँकांकडे वर्ग केले. मात्र बँकांनी या ना त्या कारणामुळे जिल्ह्यातील ३ हजार लाभार्थ्यांना पैकी केवळ १ हजार १११ लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजूर केले. या लाभार्थ्यांना ७१ कोटी ८७ लाख रुपयांचे कर्ज मंजूर करून अदा केले. त्यामुळे या १ हजाराहून अधिक लाभार्थ्यांना आपला नवीन उद्योग सुरू करण्यास मदत मिळाली असली तरी जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँकांचे काम असमाधानकारक आहे. या बँकांकडे मोठ्या प्रमाणात प्रलंबित प्रस्ताव आहेत. त्यामुळे आगामी काळात या बँकांच्या शाखा वाढवून प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्याकडे भर देण्यात येणार आहे. त्यासाठी दर महिन्याला आढावा बैठक जिल्हा प्रशासनाकडून घेण्यात येणार आहे, अशी माहिती महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी आमदार मेघना बोर्डीकर, आनंद भरोसे, जिल्हा समन्वयक भारत गोरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळा अंतर्गत युवकांना व्यवसाय उभारण्यासाठी बँकांकडून या कर्जापोटी लागणारे व्याज राज्य शासन भरते. त्यामुळे राष्ट्रीयकृत बँकांबरोबरच जिल्हा मध्यवर्ती बँकेने ही या योजनेअंतर्गत कर्ज प्रस्ताव मंजूर करून लाभार्थ्यांना व्यवसाय उभारण्यासाठी मदत करणे गरजेचे आहे. परंतु, परभणी जिल्हा बँकेतून अद्याप पर्यंत एकही प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला नाही. याबाबत जिल्हा बँकेच्या व्यवस्थापकांशी बोलून चर्चा करणार आहोत. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ अंतर्गत राज्यामध्ये ७४ हजार ९७५ लाभार्थ्यांना ५६८३ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. विशेष म्हणजे ६१६ कोटींचा व्याज परतावा बँकांना अदा करण्यात आला आहे. परभणी जिल्ह्यात मात्र या उलट परिस्थिती आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी आगामी काळात प्रयत्न केले जाणार आहेत. राज्य शासनाकडून या महामंडळासाठी मोकळा हात असताना परभणी जिल्ह्यात मात्र बँकांचे आडमुठे धोरण पुढे येत आहे, याबाबत चर्चा करून मार्ग काढत जास्तीत जास्त तरुणांनी या महामंडळ अंतर्गत व्यवसाय उभारावेत, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे नरेंद्र पाटील यांनी यावेळी दिली.



Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा शिवसेनेला मिळणार सर्वाधिक जागा ?

**मुंबई । वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून इंडिया आघाडीनेही जागावाटपाचे काम सुरू केले आहे. या संदर्भात इंडिया आघाडीने महाराष्ट्राबाबत रणनीती आखत जागावाटपाचा संभाव्य फॉर्म्युला निश्चित केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या अंतर्गत कोणता पक्ष किती जागांवर निवडणूक लढवणार आहे याची सर्वांनाच उत्सुकता आहे. महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीचे ४ पक्ष निवडणूक लढवणार आहेत. महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागा आहेत. काँग्रेस, शिवसेना (णइढ), छ्उझ (शरद पवार गट) आणि वंचित बहुजन आघाडी हे चार पक्ष इंडिया आघाडीकडून निवडणूक रिंगणात आहेत. महाराष्ट्रात संभाव्य जागावाटपाच्या सूत्रानुसार काँग्रेस २० जागांवर निवडणूक लढवणार आहे. शिवसेनेला (यूबीटी) २० जागा देण्यात येणार आहेत, तर राष्ट्रवादी (शरद पवार) गटाला ६ जागांवर लढण्याची संधी मिळणार आहे. याशिवाय वंचित बहुजन आघाडी २ जागांवर निवडणूक लढवणार आहे.



जागावाटपाच्या आणखी एका शक्यतेनुसार, शिवसेनेला १७ ते १९ जागा मिळतील. शिवसेनेने लोकसभेसाठी २३ जागांची मागणी केली आहे. शिवसेना एकसंध असताना त्यांनी २३ जागांवर निवडणूक लढवली होती, त्यांना १८ जागांवर यश मिळाले होते. त्यामुळे शिवसेना उद्धव ठाकरे गट २३ जागांसाठी अग्रही आहे. पण सूत्रांनुसार महाविकास आघाडीत त्यांना १७ ते १९ जागा मिळू शकतात. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला १३ ते १५ जागा मिळण्याची शक्यता आहे. शरद पवार गटाने १८ जागांची मागणी केली होती. तर काँग्रेसला १२ ते १४ जागा मिळण्याची शक्यता आहे. काँग्रेसनेही १८ जागांची मागणी केली होती. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातील २-३ जागा प्रकाश आंबेडकर आणि शेतकरी संघटनेला मिळण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भाजपच्या हिंदू राष्ट्रवादाचा मुकाबला करण्यासाठी काँग्रेसला उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला समान जागा द्यायची आहे. पक्ष फुटूनही शिवसेना समर्थक उद्धव ठाकरे यांच्यासोबत असल्याचे मानले जात आहे. त्याचवेळी अजित पवार वेगळे झाल्यानंतर राष्ट्रवादीकडे फारसे नेते उरलेले नाहीत, त्यामुळे कमी जागांवर तडजोड करण्यासाठी राष्ट्रवादीचे मन वळवले जाईल. दलित मते एकसंध ठेवण्यासाठी प्रकाश आंबेडकर यांच्या बहुजन वंचित आघाडीला २ जागा दिल्या जाऊ शकतात. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजप महाराष्ट्रात सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला होता. २०१९ मध्ये भाजप आणि शिवसेनेने युती करून निवडणूक लढवली होती. त्यावेळी शिवसेनेतही दोन गट पडले नव्हते. भाजपने २३ जागा जिंकल्या होत्या, तर अविभाजित शिवसेनेने २३ जागा लढवून १८ जागा जिंकल्या होत्या. त्यामुळेच शिवसेनेने (णइढ) २३ जागांवर निवडणूक लढवण्याची मागणी केली होती. महाराष्ट्रात काँग्रेसला फक्त एक जागा मिळाली होती, तर अविभाजित राष्ट्रवादी काँग्रेसला ४ जागा मिळाल्या होत्या.

# सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

येथील देवगिरी प्रतिष्ठान बीड संचलित तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या १९२ व्या जयंती निमित्त दि.०९ जानेवारी रोजी सकाळी ११.०० वा तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथे 'मी सावित्री ज्योतीबा फुले बोलतेय!' या एकपात्री नाटकाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महापुरुषाच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी सादरकर्ते डॉ. प्रतिभा जाधव (साहित्यिक वक्ता, एकपात्री कलाकार, नाशिक), कार्यक्रमाच्या अध्यक्ष` (अध्यक्ष, तुलसी महिला मंडळ, बीड), प्रमुख अतिथी प्रा.संध्या जोगदंड (सौ. के. एस. के. महाविद्यालय, बीड), (संस्थापक अध्यक्ष,देवगिरी प्रतिष्ठान,बीड), प्रा.शामल भिवराव जाधव (मिलीया महाविद्यालय, बीड), प्राचार्य लंकेश्वर थोरात (तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय,बीड), उपप्राचार्य डी.जी.निकाळजे (तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय,बीड),प्राचार्य उमा जगतकर ( तुलसी इंग्लिश स्कूल, बीड) यांची उपस्थिती होती. 'मी सावित्री ज्योतीबा फुले बोलतेय!' या एकपात्री नाट्य प्रयोगाच्या सादरीकरणातून नाशिक येथील प्रा.डॉ.प्रतिभा जाधव यांनी सावित्रीमाई फुले यांच्या जीवनावरील विविध प्रसंग साकारत उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी त्यांनी सावित्रीमाई फुले यांच्या जीवन चरित्राचा सखोल परिचय त्यांच्या सादरीकरणातून करून दिला. यात प्रामुख्याने स्त्री भ्रूणहत्या, महिलांवर होणारे विविध अत्याचार आणि सावित्रीमाई फुले यांनी महिलांसाठी राबविलेले विविध सामाजिक उपक्रम यातील विविध प्रसंगाचे अतिशय प्रभावी सादरीकरण केले. सावित्रीमाई यांच्याआयुष्यातील कठीण संघर्षाच्या प्रसंगांची माहिती देत त्यांच्या कार्यकर्तृत्वाचीही माहिती त्यांनी एकपात्री सादरीकरणातून करून दिली. त्यांनी सादर केलेल्या एकपात्री प्रयोगाला उपस्थितांनी भरभरून दाद दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयश्री पवार यांनी केले. सूत्रसंचालन जोत्सना राठोड यांनी केले.

# ई-केवायसी,आधार मोहीमेला शेतकऱ्यांचा प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री किसान सन्मानयोजने अंतर्गत मागील सहा महिन्यांत १ लाख ३ हजार ८९७ शेतकऱ्यांची ई- केवायसी पूर्ण झाली आहे. ऑक्टोबर व नोव्हेंबर या दोन महिन्यांच्या कालावधीत कृषी कर्मचाऱ्यांनी ७२ हजारांवर शेतकऱ्यांची ई-केवायसी पूर्ण केली आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी आता आधार लिंक खात्यात जमा होत असल्याने ज्या लाभार्थींनी आपले पी एम किसान चे खाते आधारला लिंक केले नसेल त्यांनी तात्काळ खाते आधार लिंक करावे अथवा पोस्टात खाते काढून घ्यावे. यासाठी सध्या कृषि विभागामार्फत मोहीम राबविण्यात येत आहे. कृषी विभागाच्या तालुका/ग्रामस्तरीय स्तरीय क्षेत्रीय अधिकारी कर्मचारी यांच्याशी संपर्क साधुन ई-केवायसी पूर्ण केल्यास शेतकऱ्यांना त्याचा लाभ घेता येईल. कृषीमंत्री ुडे यांच्या संकल्पनेतून २ ऑक्टोबर हा दिवस बीज प्रक्रिया व ई-केवायसी दिन म्हणून कृषी विभागाकडून साजरा करण्यात आला. या एकाच दिवशी जिल्हाभरात ७४० ठिकाणी मेळावे घेण्यात आले. आणि हजारो ई-केवायसी या दरम्यान करण्यात आले. ई-केवायसी शेतकऱ्यांसाठी फायद्याची आहे. पंतप्रधान किसान सन्मान योजना व नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना ई-केवायसी बंधनकारक करण्यात आली आहे. कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून ई-केवायसी केली जात असल्याने शेतकऱ्यांना पुन्हा ही प्रक्रिया करण्याची गरज राहत नाही.

# हिंगोली जिल्हयात पाणी पुरवठा विभाग अॅक्शन मोडवर ; कंत्राटदारांना नोटीस

**हिंगोली । वृत्तसंस्था**

हिंगोली जिल्हयात नळ पाणी पुरवठा योजनेचे काम मंजूर होऊनही कामे सुरु करणाऱ्या कंत्राटदारांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या असून तातडीने कामे सुरू न झाल्यास काळ्या यादीत टाकण्याचा इशारा देण्यात आला आहे. हिंगोली जिल्हयात जल जीवन मिशन अंतर्गत ६५० पेक्षा अधिक नळ पाणी पुरवठा योजनेचे कामे मंजूर करण्यात आली आहेत. यामध्ये २८७ कामे दुरुस्तीची तर इतर ठिकाणी नळ पाणी पुरवठा योजनेचे नवीन काम केले जाणार आहे. त्यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने रितसर निवीदा काढून कंत्राटदारांना कामे सुरु करण्याबाबत कार्यारंभ आदेशही देण्यात आले आहेत. मार्च २०२४ पर्यंत हि कामे सुरु करून ग्रामीण भागात गावकऱ्यांना नळ पाणी पुरवठा योजनेद्वारे पाणी देण्याचे उदिष्ट आहे. मात्र जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी संजय दैने, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता प्रिती माकोडे यांनी घेतलेल्या आढाव्यामध्ये ३० कंत्राटदारांनी कामेच सुरु केली नसल्याचे दिसून आले. त्यानंतर विभागीय आयुक्त कार्यालयाने घेतलेल्या बैठकीतही यावर नाराजी व्यक्त करून संबंधित कंत्राटदारांवर कारवाई करण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्यानुसार ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने नळ योजनेची कामे सुरु न करणाऱ्या ३० कंत्राटदारांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. यामधे तातडीने कामे सुरु करावे अन्यथा काळ्या यादीत टाकण्याचा इशाराही दिला आहे. उशीरा का होईना पाणी पुरवठा विभाग क्शनमोडवर आल्यामुळे नळ पाणी पुरवठा योजनेची कामे सुरु होणार असल्याचे चित्र आहे. लोहरा येथे निकृष्ठ दर्जाचे काम झाल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला होता. त्यासाठी उपोषणाचा इशाराही दिला होता. मात्र गावातील निकृष्ठ कामाकडे पाणी पुरवठा विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे सदर योजना किती दिवस तग धरणार असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# देशात लोकशाहीच संपुष्टात आणली जातेयं, द्वेष वाढविला जातोय -राष्ट्रवादी

**मुंबई । वृत्तसंस्था**

देशात लोकशाहीचा गळा दाबला जात असून, देशात धार्मिक, जातीय द्वेष वाढविला जात आहे. यामुळे सध्या देशासमोर असणारी बेकारी, महागाई, गरिबी आदी प्रश्न बाजूला पडले जात आहेत, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसने केली आहे. पत्रकार हे समाजमन तयार करण्याचे महत्त्वाचे काम करीत आहेत. अचूक बातम्या देणे, एक आव्हान बनले आहे. देशात प्रथमच सर्व विरोधी खासदारांना निलंबित करण्यात आले. मात्र, त्याविरोधात कुठे आवाज उठताना दिसत नाही, माध्यमात फारशी चर्चा होत नाही. लोकशाहीची जागा झुंडशाहीने घेणे देशासाठी धोकादायक आहे. आमच्याकडे बहुमत आहे म्हणजे आमचेच राज्य अशी



सत्ताधाऱ्यांची मानसिकता बनली आहे, अशी टीका केली आहे. शासकीय आणि प्रशासकीय अनास्थेमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. पेपरफुटीला कारणीभूत असलेले दलाल आपली पोळी भाजून घेत आहेत. जर तरची भाषा करत सत्तेतील जबाबदार व्यक्ती नाममात्र राहण्याचा प्रयत्न करत आहे. राज्यातील तरुण पिढीची अवस्था दयनीय करत, भावी प्रशासकीय यंत्रणेची घडी विस्कटून टाकण्याचा प्रयत्न आम्ही हाणून पाडूअसा इशारा त्यांनी दिला. सरकारची अनास्थाच विद्यार्थ्यांच्या मुळावर येऊन टेकल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

# प्रात्याक्षिक परीक्षेत गैरप्रकार आढळल्यास महाविद्यालय जबाबदार

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

दहावी-बारावीच्या प्रात्याक्षिक परीक्षेत गैर प्रकार घडून येत असल्याच्या तक्रारी आल्या आहेत. असे प्रकार होत असल्याचे ते मंडळास कळवावे. अन्यथा होणाऱ्या कार्यवाहिला महाविद्यालयच जबाबदार राहिल असे स्पष्ट आदेश मंडळाकडून देण्यात आले आहेत. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या बारावीच्या लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते ११ मार्च यावेळेत होणार आहेत. तर दहावीच्या परीक्षा १ ते २६ मार्च दरम्यान होणार आहेत. त्यापूर्वी प्रात्याक्षिक परीक्षा होणार आहेत. त्याचे वेळापत्रक मंडळाने जाहिर केले आहे. या वेळापत्रकानुसार दहावीच्या प्रात्याक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा १० ते २९ फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. बारावीच्या प्रात्याक्षिक परीक्षा २ ते २० फेब्रुवारी दरम्यान प्रात्याक्षिक परीक्षा होणार आहेत. कोविड काळात अंतर्गतच परीक्षकांच्या निगरानितच प्रात्याक्षिक परीक्षा झाल्या होत्या. आता त्या पारंपारिक पद्धतीने म्हणजे एक अंतर्गत आणि एक बाह्य परीक्षक असताना होतील. यावेळी प्रात्याक्षिकाच्या गुणदान पद्धतीवरही भरारी पथकाची नजर विभागीय मंडळांनी ठेवणे अपेक्षित असल्याचे मंडळाने म्हटले आहे. याचे कारण शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल शंभर टक्के लागावा म्हणून विज्ञानाच्या प्रात्याक्षिक परीक्षा आणि तोंडी परीक्षांमध्ये २० पैकी १८ किंवा २० पैकी २० गुण दिले जातात. विज्ञानाचे प्रयोग होतात का नाही? अनेक ठिकाणी तुकड्या बंद पडू नये म्हणून फक्त दाखले गोळा करुन कॅटलॉगला विद्यार्थी संख्या दाखवली जाते. वर्षभर बोगस हजेरी लावली जाते. अशा तक्रारी आल्यास मंडळाच्या निदर्शनास आणून द्यावे अन्यथा होणाऱ्या कार्यवाहिस कनिष्ठ महाविद्यालय जबाबदार राहिल असे पुणे मंडळाने दिलेल्या पत्रात म्हटले आहे. यंदा छत्रपती संभाजीनगर विभागातून दहावीसाठी १ लाख ७५ हजार तर बारावीसाठी १ लाख ६५ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. यात वाढ होण्याची शक्यता आहे.

# धारूर येथे सप्ताह व कथेचे आयोजन

किल्लेधारुर दि.७(प्रतिनिधी) शहरातील शिक्षक कॉलनी येथे वै. श्री. हभप नारायण महाराज चिंचपूरकर यांच्या २२ व्या पुण्यस्मरण निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह व संत कथा सोहळा चे आयोजन दि.१० ते १६ जानेवारी या दरम्यान करण्यात आले असून ज्ञानेश भक्त आचार्य श्री हभप अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. तरी या कीर्तन महोत्सवाचा लाभ शहर व परिसरातील नागरिकांनी घ्यावा असे आवाहन हभप ज्ञानेश्वर माऊली ंनी केले आहे. श्री.हभप नारायण महाराज चिंचपूरकर यांच्या बाविसाव्या पुण्यस्मरण निमित्ताने शहरातील शिक्षक कॉलनी येथे अखंड हरिनाम सप्ताह व संत कथा सोहळा संपन्न होत आहे. या सप्ताहात श्री हभप ज्ञानेश्वर माऊली लांब धारूरकर हे आपल्या रसाळ वाणीतून दूपारी २ ते ४ या वेळेत संत कथा सांगणार आहेत. हा सप्ताह दिनांक १० ते १६ जानेवारी २०२४ या कालावधीत होणार असून दररोज दोन वेळा किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते १२ या वेळेत दि.१० जानेवारी रोजी रामायणाचार्य तुकाराम महाराज आंधळे, ११ जानेवारी रोजी रामायणाचार्य गणेश महाराज जोगदंड, दि.१२ जानेवारी रोजी भागवताचार्य शिवानंद शास्त्री, १३ जानेवारी रोजी हभप नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरी, १४ जानेवारी रोजी श्री हभप श्रीनिवास महाराज जगताप, दि.१५ जानेवारी रोजी हभप अर्जुन महाराज मुंडे, दि.१६ जानेवारी रोजी हभप महंत पांडुरंग महाराज मुंडे यांचे तर संध्याकाळी ७ ते ९ या वेळेत दि.१० जानेवारी रोजी विनोदाचार्य श्री हभप प्रकाश महाराज साठे, दि.११ जानेवारी रोजी भागवताचार्य डॉ.चत्रभुज वायबसे, दि,१२ जानेवारी रोजी महंत श्रीराम महाराज विडेकर, दि.१३ जानेवारी रोजी हभप रामायणाचार्य ज्ञानेश्वर माऊली लांब गुरुजी, दि.१४ जानेवारी रोजी श्री महंत किसन महाराज पवार, दि.१५ जानेवारी रोजी महंत भगवान महाराज वरपगावकर तर दि.१६ जानेवारी रोजी श्री हभप डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांचे कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दि. १७ जानेवारी बुधवार रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ज्ञानेश भक्त आचार्य श्री हभप अर्जुन महाराज लाड गुरुजी यांच्या अमृततुल्य काल्याचे कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे.

# मराठ्यांना उचकवू नका, ओबीसी नेत्यांना नरेंद्र पाटलांचा थेट इशारा

**परभणी । प्रतिनिधी**

सरसकट मराठा आरक्षण आणि मनोज जरांगे यांच्यावर सतत टीका करणाऱ्या ओबीसी नेत्यांवर अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी निशाणा साधला आहे. ओबीसी नेत्यांनी आपले काम करावे, मराठा समाजाच्या विरोधात त्यांनी वक्तव्य करू नयेत. मराठा समाजाला चेतवण्याचा प्रयत्न केल्यास मराठा समाज घरात घुसून काय करायचं ते करून जाईल हे तुम्हाला माहीत आहे, असा थेट इशारा नरेंद्र पाटील यांनी दिला आहे. परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतांना प्रतिक्रिया देतांना त्यांनी हे वक्तव्य केले आहे. यावेळी बोलतांना नरेंद्र पाटील म्हणाले की, ओबीसी नेत्यांनी एक लक्षात घेतलं पाहिजे. मनोज जरांगे हे जी काही मागणी मांडतायत, ती काही प्रमाणात योग्य आहे. वर्षानुवर्ष मराठा समाजाच्या हक्कासाठी लढणाऱ्या कार्यकर्त्याला दाबण्याचे काम काही नेत्यांनी केलं आहे. त्यामध्ये ओबीसीचे काही नेते जे आज भांडतायत ते पुढे होते. वेगवेगळ्या समितीचे अहवाल मराठा समाजाच्या बाजूने आल्यावर देखील त्या समित्यांना सूचना देऊन ते अहवाल पारित होऊ दिले नाही. असे काही द्वेषी लोक आहेत. त्यांनी आता गप्प बसले पाहिजे. समाजाला अंगावर घेऊ नयेत. आज मोठ्या प्रमाणात मराठा समाज चिडलेला आहे. त्यांना वारंवार त्रास दिला जातो. त्यामुळे तुम्ही तुमचं बघा, तुमचं रक्षण करा. तुम्ही आमच्या नादाला कशाला लागत आहात. उगाच व्यासपीठावर



जाऊन तुम्ही आम्हाला चेतवात असून, त्याची काय गरज आहे. तसेच जर चेतवायची गोष्ट निघाली तर मराठा समाज घरात घुसून काय करायचं ते करून जाईल हे तुम्हाला माहीत आहे. त्यापेक्षा ओबीसी समाजाच्या नेत्यांनी आपली संघटना आणि आपलं कसं व्यवस्थित होईल हे पाहावं. आम्ही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे पाहून काम करतोय. ते आम्हाला न्याय देतील तुमच्या पोटात का दुखत आहे,असे नरेंद्र पाटील म्हणाले. शिंदे समितीचा सर्व्हेक्षण अहवाल जोपर्यंत योग्य येणार नाही. तोपर्यंत मागासवर्ग आयोग मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी निर्णय घेऊ शकत नाही. अशाप्रकारे दबाव तयार करून मुंबईसारख्या सर्व जाती-धर्माच्या शहराला मोठा ताण निर्माण झाल्यास तो चुकीच्या दिशेने जाऊ शकतो. आज मी देखील मुंबईत राहतो, मुंबईत आंदोलन करतांना खूप मर्यादा असतात. या ठिकाणी जातीय भानगडी होऊ शकतात. आंतरवाली सराटीच्या आंदोलनात देखील काही लोक बाहेरून घुसली होती. काहींनी जाळपोळ केली. त्याप्रमाणे गालबोट लागू शकतो. त्यामुळे जरांगे पाटील यांनी याचा विचार केला पाहिजे आणि त्यांनी ठरवलं पाहिजे. मुंबईसारख्या शहराला आपण किती ताण द्यायचा हे आंदोलन करणाऱ्या नेत्यांनी ठरवलं पाहिजे. दबावाचा वापर करून जर आपण एखादा अहवाल घेतला आणि तो न्यायालयात पुन्हा रद्द झाल्यास अडचण होईल असेही पाटील म्हणाले.

# जिल्हा परिषद कार्यालयात दारू पिणारा शिक्षक निलंबित

**बीड । प्रतिनिधी**

मद्यपान करून जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात गोंधळ घातल्याप्रकरणी राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक विजय कुंडलिक आमटे यांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशाने थेट निलंबित करण्यात आले आहे. शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांनी ही माहिती दिली. निलंबित करण्यात आलेले शिक्षक आमटे हे प्राथमिक पदवीधर असून सध्या त्यांच्याकडे आष्टी तालुक्यातील दौलावडगाव केंद्राचा प्रभारी पदभार आहे. पदोन्नतीच्या अनुषंगाने ५ जानेवारी रोजी ते बीड येथे जिल्हा परिषदेत आले होते. सकाळी शिक्षणाधिकाऱ्यांची भेट



घेतली होती. त्यानंतर दुपारी पुन्हा शिक्षण विभागात येऊन पदोन्नतीबाबतची संचिका तत्काळ प्रस्तावित का करत नाहीत? अशी विचारणा करत गोंधळ घातला. 'माझे काम लवकर करा, नाही तर मी इमारतीवरून उडी मारीन' असा इशारा देत शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत हुज्जत घातली होती. मद्यपान करून शिक्षक आमटे यांनी धिंगाणा घातल्याची तक्रार याप्रकरणी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली होती. त्यानुषंगाने सोमवारी शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेऊन आलेली तक्रार मांडली. यावर पाठक यांनी गांभीर्याने दखल घेत शिक्षक विजयकुमार आमटे यांना गैरवर्तन केल्याप्रकरणी त्यांच्यावर जिल्हा परिषद अधिनियमानुसार निलंबित करण्यात आले.

# चिमुकलीस पिशवीत बांधून रस्त्यावर फेकले

**परळी । प्रतिनिधी**

येथून जवळच असलेल्या मालेवाडी रस्त्यावर सहा महिन्याच्या चिमुकलीला पिशवीत बांधून रस्त्यावर फेकून दिल्याची संतापजनक घटना सोमवारी रात्री सव्वाआठच्या सुमारास उघडकीस आली आहे. माता ना तू वैराणी असा काहीसा प्रकार घडल्याने खळबळ उडाली आहे. परळीच्या मालेवाडी गावाच्या रस्त्यावर पांढऱ्या रंगाच्या पिशवीमध्ये लाल



बेडशीटमध्ये गुंडाळलेले जिवंत मूल असल्याची माहिती सोमवारी रात्री ८ वाजता परळी बामीण पोलिसांना फोनवरून कळाली. लागलीच पोलीस निरीक्षक हेमंत कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण गीते, पोलीस कर्मचारी सुनील अन्नमवार हे घटनास्थळी दाखल झाले. पाहणी केले असता सहा ते आठ महिन्यापूर्वी जन्मलेली मुलगी त्यामध्ये आढळून आली. चिमुकलीस पोलिसांनी तत्काळ उपचारासाठी परळीच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर अधिक उपचारासाठी चिमुकलीस अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया मंगळवारी दुपारी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात सुरू करण्यात आली आहे.

# विद्यार्थ्यांना सखोल ज्ञान प्राप्त व्हावे -डॉ.ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

आपल्या सौरमालेतील ग्रहांची दृष्यमानता कशी आहे , खगोलीय विश्वातील आभासी दुनिया कशी , सुर्याच्या जवळचा ग्रह कोणता ,आकाशगंगेची नेमकी रचना कशी आहे ,आठ ग्रह कसे आहेत या सर्व प्रश्नांची उत्तरे व ज्ञान विद्यार्थ्यांना माहिती व्हावे यासाठी यश पोलाद ट्रेडर्स चे मालक महादेव ढास यांच्या पुढाकाराने भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लिंबागणेश ५ ते १२ वी मधील विद्यार्थ्यांना माहितीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.डोमद्वारे घुमट उभारुन विद्यार्थ्यांना आकाशगंगेची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.विद्यार्थ्यांनी २५-३० मिनिटे आकाशगंगेच्या दृष्याचा अनुभव घेतला. लिंबागणेश येथील यश ट्रेडर्स उद्योग समूहाचे महादेव ढास यांच्या पुढाकारातून व पोलाद यांच्या संयुक्त विद्यमाने भालचंद्र माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना आकाशगंगा सौरमाला याविषयी सखोल ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी माहितीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.जवळपास ३६० चौरस फूट क्षेत्रफळाच्या जागेत प्रक्षेपक घुमट उभारून विविध स्लाईड प्रोजेक्टरच्या गतिमान हालचालीतुन अंतराळ व ग्रहांची दृष्यमानता विद्यार्थ्यांना खगोलीय ▶▶ पान २ वर

# कामचुकार मुख्याधिकाऱ्यांचा संघटनांकडून निषेध

माजलगाव ( प्रतिनिधी ) येथील नगर परिषदेचे मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण हे गेल्या अनेक महिन्यापासून नियमितपणे नगरपरिषदेत न येता केवळ दलाली तसेच बोगस बिले काढण्यात पटाईत असलेले चव्हाण फक्त बिला वर सह्या करण्यासाठी येतात परंतु सामान्य माणसांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने न पाहता त्यांना दिवसे दिवस नगरपालिकेच्या कार्यालयात चकरा मारायला लावतात याचा निषेध म्हणून दि ०९ जानेवारी मंगळवार रोजी शेकाप, प्रहार संघटना तसेच मौलाना आझाद, वंचित बहुजन आघाडी यांच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांच्या खुर्चीला हार घालून त्यांच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली मुख्याधिकारी यांनी यापुढे नगरपरिषदेच्या कामकाजात सुव्यवस्था न आणल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

# शाखाधिकारी यांची नियुक्ती करा नसता आंदोलन -काळकुटे

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील येळंब घाट बँक ऑफ महाराष्ट्र शाखेला गेल्या तीन महिन्यांपासून शाखा अधिकारीच नसल्याने कामकाज मोठ्या प्रमाणात ठप्प झाले आहे. या शाखेत जवळपासच्या ५० पेक्षा अधिक गावातील लोकांचे खाते आहेत. हजारो शेतकरी आणि शेकडो व्यापाऱ्यांचा व्यवहार या शाखेत असुन शाखा अधिकारी तीन महिन्यांपासून नसल्यामुळे ग्राहकांचे कामं होत नाहीत यामुळे ग्राहक त्रस्त आहेत. शेतकरी आणि व्यापार क्षेत्रातील हजारो ग्राहकांचे कामं खोळंबले असुन तात्काळ शाखेला शाखा



अधिकारी देण्यात यावा अशी मागणी छावा चे युवा अध्यक्ष अशोक काळकुटे यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे केली आहे. यासह जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे आणि तहसीलदार हजारे यांना देखील निवेदन देण्यात आले आहे. आठ दिवसाच्या आत शाखा अधिकारी नियुक्त न केल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील दिला आहे. यामुळे सतत चर्चेत असणारी बँक ऑफ महाराष्ट्र येळंब घाट शाखा पुन्हा एकदा आंदोलनाने चर्चेचा विषय बनणार का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. गेल्या तीन महिन्यांपासून लोकांचे कुठलेही काम बँक ऑफ महाराष्ट्र येळंब घाट शाखेत होत नसून येत्या आठ दिवसाच्या आत शाखा अधिकारी न दिल्यास लोकशाही मार्गाने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करणार असा इशारा युवा अध्यक्ष अशोक काळकुटे यांनी दिला आहे. यापूर्वी देखील या शाखेतील मनमानी आणि गलथान कारभाराच्या विरोधात लोकशाही मार्गाने मोठं आंदोलन उभं राहिलं होतं. या आंदोलनाने शाखेतील कामकाज सुरळीत सुरू झाले. मात्र पुन्हा वरिष्ठांच्या चुकीच्या धोरणामुळे शाखेला अधिकारीच नसल्याने सर्व कामे ठप्प झाले असून तात्काळ शाखा अधिकारी देण्यात यावा अन्यथा शेतकरी आणि व्यापाऱ्यांना सोबत घेऊन आंदोलन करू अशी प्रतिक्रिया काळकुटे यांनी दिली आहे.

# कै.आवाड यांना डॉ.आंबेडकर विद्यालयामध्ये श्रध्दांजली

**बीड । प्रतिनिधी**

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित डॉ.आंबेडकर विद्यालयामध्ये या विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक विष्णु गणेश आवाड यांचे वडील आणि सामाजिक, कार्यकर्ते कै गणेश लिंबाजीराव आवाड यांना भावपूर्ण श्रध्दांजली आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ, बीड या संस्थेचे अध्यक्ष बी. ए. एस. धुतालमाल, सचिव ॲड.व्ही. बी. मगर, सर्व संचालक आणि मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला. आवाड यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी वृध्दापकाळाने कळंब जि.धाराशिव येथे दि. ०३ जानेवारी २०२४ रोजी निधन झाले होते.

# मौलाना आझाद अल्पसंख्याक महामंडळात ६१० अर्ज दाखल

**वडवणी । प्रतिनिधी**

मौलाना आझाद अल्पसंख्याक अर्थिक विकास महामंडळाच्या मुदत कर्ज योजनेचा सोमवार हा शेवटला दिवस होता आणि बीड मधील कार्यालयात फक्त रांगा लागलेले चित्र पहावयास दिसत होते याचे कारण म्हणजे बीड येथील मौलाना आझाद अल्पसंख्याक विभागाचे जिल्हा व्यवस्थापक इम्रान कादरी यांच्या अथक प्रयत्नाने व जागरुकतेमुळे आज संपूर्ण महाराष्ट्रात सर्वात जास्त मुदत योजनेचे अर्ज हे बिड जिल्ह्यातुन गेल्याचे समजले आहे. बीड जिल्हा व्यवस्थापक इम्रान कादरी यांच्या प्रयत्नाला यश आले आहे. जिल्हाभरात संपर्क, सहजच सर्व सामान्यांना उपलब्ध होणारा अधिकारी, एकाच रिंग मध्ये फोन उचलून या योजनेची संपूर्ण माहिती सहजच पुरवून सर्वसामान्यांना सहज या योजनेचा लाभ घेता यावा याची जबाबदारी घेऊन वेळ देणाऱ्या इम्रान कादरी यांच्यामुळे हे शक्य झाले आहे. सोमवारी या योजनेचा शेवटचा दिवस होता. आणि कार्यालयात लाभार्थ्यांची गर्दीच गर्दी होती आणि वेळ संपल्यानंतरही लाभार्त्यांना वेळ न मिळाल्याने इम्रान कादरी यांनी टोकंन देऊन त्या लाभार्त्यांना मंगळवारचा वेळ देऊन येण्यास सांगीतले असून सर्व ६१० लाभार्त्यांना मुदत कर्ज योजनेसाठी अर्ज आलेले असून याचा संपूर्ण श्रेय हा जिल्हा व्यवस्थापक इम्रान कादरी यांना जात आहे.

# विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व समाजाभिमुख असावे

**माजलगाव । प्रतिनिधी**

व्यक्तीचा शारीरिक, मानसिक,बौद्धिक व भावनिक विकास हा सामाजिक प्रक्रियेद्वारे होत असतो.त्यामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व हे समाजभिमुख असावे.समाजभिमुख व्यक्तिमत्त्वामुळे सामाजिक हितसंबंध जोपासली जातात असे प्रा. सुदर्शन स्वामी यांनी कार्यशाळेत बोलताना व्यक्त केले. सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवशीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. कार्यशाळेच्या समारोप सत्राच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जी.के. सानप होते तर प्रमुख वक्ते प्रा. सुदर्शन स्वामी होते. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. बालाजी बोडके,प्रा.डॉ.भाऊसाहेब राठोड, प्रा.श्रीनिवास मोतेकर, प्रा.डॉ.गणेश मोकासरे, प्रा.जावेद चाऊस,प्रा. विकास सोळंके यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना प्रा.सुदर्शन स्वामी म्हणाले व्यक्तिमत्व विकासात अनुवंशिक व वातावरणातील घटकांचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. प्रभावी इव्यक्तिमत्व हे फक्त बाह्य शारिरीक रचनेवरून नसते तर आंतरिक गुणांवर ठरत असते. त्यामुळे व्यक्तीची वैचारिकता सर्वसमावेशक असावी. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. जी.के. सानप म्हणाले की जबाबदार व जागरूक नागरिक बनविणे हा शिक्षणाचा उद्देश आहे.शैक्षणिक मूल्य आत्मसात करून विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व प्रभावी करावे. यावेळी प्रा.डॉ.भाऊसाहेब राठोड यांनी मनोगत व्यक्त ▶▶ पान २ वर

# श्री साईनाथ पालखीचे आज मंगळवारी तलवाडयात आगमन

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील पावन दत्त मंदिर याठिकाणी देगलूर ते शिर्डी श्री साईबाबा पालखीचे आगमन मंगळवार दि.०९ जानेवारी २०२४ आज रोजी सकाळी ठिक ११ वाजता होणार असून या पालखी सोहळ्यात जवळपास ३०० साईभक्त पायी पदयात्रा करत निघालेले आहेत. श्री साईबाबांची हि पालखी देगलूर येथून ०१ जानेवारी रोजी निघालेली असून मंगळवार दि.०९ जानेवारी रोजी तलवाडयात आगमन होणार आहे. या पालखी सोहळ्याचे नेतृत्व वडगावे हे गेल्या अनेक वर्षांपासून करत आहेत. तलवाडा येथील पावन दत्त मंदिरात दुपारी आरती होऊन त्यानंतर पालखी सोहळ्यातील साईभक्तांना महाप्रसादाची व्यवस्था पावन दत्त मंदिर संस्थान समितीच्या वतीने करण्यात आली आहे. मंगळवारी रात्री बागपिंपळगाव याठिकाणी पालखीचा मुक्काम असणार आहे. तरी तलवाडा येथील भाविकांनी श्री साईबाबा पालखी सोहळ्यातील साईभक्तांचे स्वागत व दर्शनाचा लाभ घेण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन या संस्थानचे सचिव - अरूण हाटकर सर व पावन दत्त मंदिर संस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाची नुतन कार्यकारणी जाहीर




**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील नामवंत असलेल्या श्री. सिद्धेश्वर संकुलाची नुतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर झाली असून, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षपदी सुरेंद्र रेदासनी व कार्यवाह पदी अड. विश्वासराव जोशी, सीबीएसई विभागाचे अध्यक्ष शशिकिरण गडम व प्राथमिक विभागाच्या अर्थखात्यावर संतोष अब्बड यांची निवड झाली आहे. या निवडी बद्दल माजलगाव तालुका व्यापारी महासंघ, मैत्री ग्रुप, किर्तन श्रावक संघ व किर्तन महोत्सव समितीच्या वतीने नुतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार व्यापारी महासंघाच्या कार्यालयात पार पडला. यावेळी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी नुतन कार्यकारिणीतील पदाधिकारी यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमच्या ▶▶ पान २ वर



बीड : राम प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचं निमंत्रण देताना श्री सोमेश्वर मंदीर संस्थानचे अध्यक्ष नवनाथ शिराळे पाटील.

# दिनदर्शिका माहितीपूर्ण व दर्जेदार -बाजीराव धर्माधिकारी

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी येथील सा.परळी समाचारच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी दर्जेदार व सर्व माहिती पुर्ण अशी विरशैव दिनदर्शिकाचे प्रकाशन मा.नगराध्यक्ष तथा वि.दा.सावरकर पतसंस्थेचे चेअरमन बाजीरावभैय्या धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ. वंगे (दादा) हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सद्गुरु अनुराधाताई माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष भास्करमामा चाटे, डॉ.विवेकजी दंडे, सामाजिक कार्यकर्ते सुरेशजी टाक हे होते. हा प्रकाशन सोहळा हॉटेल सोमनाथच्या सभागृहात नुकताच घेण्यात आला. परळी समाचार हे वृत्तपत्र प्रतिवर्षी उत्कृष्ट, वाचनीय व संग्रहणीय असा दिपावली अंक प्रकाशित करीत असतात तसेच दर्जेदार व माहितीपुर्ण अशी विरशैव दिनदर्शिकाही प्रकाशित होत असते. नुकतेच या वीरशैव दिनदर्शिकेचे प्रकाशन माझ्या हस्ते करण्यात आले. खरोखरच संपादक आत्मलिंग शेटे यांचे करावे तेवढे कौतुक कमीच असल्याचे मा.बाजीरावभैय्या धर्माधिकारी यांनी या प्रकाशन प्रसंगी आपली भावना व्यक्त केली व संपादक आत्मलिंग शेटे यांची अशीच प्रगती व्हावी असे सांगितले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.हरिश्चंद्र वंगे दादा यांनी देखील या वीरशैव दिनदर्शिकेबाबत संपादक आत्मलिंग शेटे यांना शुभेच्छा दिल्या व त्यांच्या दिपावली अंक हा देखील संग्रहणीय असतो. त्यात त्यांनी ▶▶ पान २ वर

# तर रोजगार हमीवरील निम्म्याच मजुरांना मिळेल मजुरी ; आधार क्रमांक आधारित पेमेंट सिस्टिम लागू

**बीड । प्रतिनिधी**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना आधार क्रमांक आधारित पेमेंट सिस्टिमद्वारे मजुरी दिली जाणार आहे. बीड जिल्ह्यातील एबीपीएससाठी एक लाख ९१ हजार मजूर पात्र आहेत तर एक लाख १६ हजार मजूर अद्याप प्रलंबित आहेत. त्यामुळे एकूण नोंदणीकृत मजुरांपैकी एबीपीएस पात्र मजुरांनाच मजुरी मिळेल, प्रलंबित असणाऱ्या मजुरांना काम करूनही त्यांना मजुरी मिळणार नाही. एकूण मजुरांपैकी निम्म्या मजुरांनाच मजुरी मिळणार आहे. आधार क्रमांक आधारित पेमेंट सिस्टमद्वारे मजुरांचा आधार क्रमांकाचा वापर केला जाईल. हा मजुराचा आर्थिक पत्ता असणार आहे. ज्या मजुरांचे जॉब कार्ड हे आधार कार्डशी लिंक आहे व आधार कार्ड बँक खात्यासोबत लिंक त्यांनाच एबीपीएसद्वारे मजुरी मिळणार आहे. मग्रारोहयोअंतर्गत बीड जिल्ह्यातील एकूण ५५ टक्के मजूर एबीपीएससाठी पात्र आहेत. दरम्यान, जॉब कार्ड आधार सोबत लिंक करण्यासाठी आतापर्यंत पाच वेळा मुदतवाढ दिली आहे. ही मुदत सध्या संपली



असून त्यास पुन्हा मुदतवाढ मिळेल की नाही हे पुढील काळात समोर येईल. मागच्या वर्षी जानेवारी महिन्यात एबीपीएस प्रणाली सक्तीची करण्यात आली होती. जॉब कार्डसोबत आधार लिंकसाठी १ फेब्रवारी, ३१ मार्च, ३० जून, ३१ ऑगस्ट व त्यानंतर ३१ डिसेंबर अशी पाच मुदतवाढ देण्यात आल्या होत्या; परंतु, आता नव्याने जॉब कार्ड सोबत आधार लिंकसाठी नवी तारीख दिली गेली नाही. त्यामुळे ज्यांचे जॉब व आधार कार्ड लिंक झाले आहे, त्यांनाच मजुरी दिली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एबीपीएससाठी अधिकारी व मजूरसुद्धा तयार नाहीत. मजुरांचे जॉब व आधार लिंकसाठी यंत्रणा आवश्यक आहे. एखाद्या मजुराचे आधार प्रमाणीकरण झाले नाही तर त्याचे जॉब कार्ड डिलिट होऊ शकते. तसेच जॉबसोबत आधार लिंक नसल्यास मजूर कामावर येणार नाहीत. त्याचा थेट परिणाम मजुरांच्या कामावर होईल. कामाची मागणी नियमित असेल तर जॉब कार्ड डिलिट होणार नाही हे जरी सत्य असले तरी काम केल्यास मजुरीच मिळणार ▶▶ पान २ वर